महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांकः-तंशिस/शैवि/डीबीटी/२०२२-२३/ 1962 दिनांकः- 17 JUN 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषयः- "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्याची निर्वाह भत्त्याची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत.

संदर्भः- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. तंनिवि-१५२१/प्र.क्र.१०७/२१/तांशि-३, दि. ०७ जून २०२२
२) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/विकाप/ २२ /१४३ / दि. १४/०६/२०२२
3) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/डीबीटी पोर्टल/२०२१/३४९५ दि. १०/१२/२०२१

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्याचे अर्ज मंजूर करतेवेळी कोविड-१९ च्या काळात राज्यात टाळेबंदी असतांना **सदरहू योजनेंकरिता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निर्वाह भत्त्याची रक्कम महिनानिहाय अदा करण्यासाठी विशेष बाब म्हणून शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली होती**. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये आपणाकडून पात्र विद्यार्थ्याची मागविण्यात आलेली माहिती, वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे.

तथापि मा. प्रधान सचिव , उच्च् व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२ जून २०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांना वास्तव्याच्या कालावधीनुसार (महीनानिहाय) निर्वाह भत्ता अदा करण्याकरिता संस्थेस त्यांच्या लॉगीनमध्ये पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तरी शै. वर्ष २०२०-२१ करिता ज्या संस्थेतील विद्यार्थी सदरहू योजनेंस पात्र झालेले आहे, अशा संस्थांच्या लॉगीन मध्ये, विद्यार्थ्याचा वास्तव्याचा कालावधी हा शैक्षणिक वर्ष ज्या महिण्यापासून सुरू झाले, त्या पुढे मोजण्यात यावा. व तो कालावधी (महीण्यामध्ये) नमुद करून सदर अर्ज मंजूरीस्तव या कार्यालयास पुनःश्च पुराव्यासह पाठविण्यात यावे. (संदर्भिय पत्र क्र. ०३ चे अवलोकन करण्यांत यावे ) तसेच विद्यार्थ्याच्या अर्जात नमुद करण्यात आलेला कालावधीचा पुरावा (उदा. धरमालकाचे किरायाचा कराराचा करारनामा, रक्कम अदा केल्याची पावती ) या कार्यालयास ई-मेल व्दारे सादर करण्यात यावे. जेणे करून सदरहू अर्जाची तपासणी करुन अर्ज मंजूरीस्तव वरीष्ठ कार्यालयास पाठविणे शकय होईल.

सहपत्रः- संदर्भिय पत्र क्र. ०१ संलग्न

(डॉ. मनोज मा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
ूरध्वनी क्र.०२२०४०९३५ Email ID: tashi3-htcd@mah.gov.in

क्र.तंनिवि-१५२१/प्र.क्र.१०७/२१/तांशि-३ दि.:७ जून, २०२२.

विषय:- डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निर्वाह भत्त्याची प्रलंबित रक्कम अदा करणेबाबत...

डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२ जून, २०२२ रोजी दालन क्र.४११, ४ था मजला, विस्तारीत इमारत, मंत्रालय, मुंबई येथे सकाळी १०.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:-
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई.
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३. संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई.
४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, विस्तारीत इमारत, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी लिमिटेड, ए.पी.जे.हाऊस, चर्चगेट, मुंबई.

प्रत:-
१. कार्यासन अधिकारी, तांशि-४ व ६. व मावी-३
२. निवडनस्ती तांशि-३.

विषय:- डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत वास्तव्याच्या कालावधीनुसार निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२ जून, २०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त...

- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२ जून, २०२२ रोजी दालन क्र.४११, ४ था मजला, विस्तारीत इमारत, मंत्रालय, मुंबई येथे सकाळी १०.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती.
- सदर बैठकीस श्री.सतीश तिडके, उप सचिव (तंत्र शिक्षण), श्रीम.सामंत, कक्ष अधिकारी (तांशि-३), डॉ.बच्छाव, सहसंचालक (उच्च शिक्षण), श्रीम.मोगरे, सल्लागार (माहिती तंत्रज्ञान संचालनालय), श्री.गावडे (महाआयटी), श्री.सावंत, प्रोजेक्ट मॅनेजर (महाआयटी), श्री.देवळे (महाआयटी), श्री.दांडगे, उपसंचालक (कला संचालनालय), श्री.बुलाणी, विशेष कार्यकारी अधिकारी (तंत्रशिक्षण संचालनालय) व श्री.पराते, विशेष कार्यकारी अधिकारी (तंत्रशिक्षण संचालनालय) हे उपस्थित होते.
- या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

१) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याची रक्कम अदा करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर बील जनरेट करण्यासाठी महाआयटीकडून अलॉटमेंट हे १० महिन्याच्या कालावधीसाठी होत असल्यामुळे व अलॉटमेंट प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार (महिन्यानुसार) करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी भरण्याचा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे, महाडीबीटी पोर्टलमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाडीबीटी पोर्टलमध्ये बदल करुन प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्यानुसार कालावधी (महिन्यामध्ये) नमूद करण्यासाठी संस्थेस त्यांच्या लॉगिनमध्ये पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल व त्या कालावधीनुसार (महिन्यानुसार) बील जनरेट करण्यासाठी अलॉटमेंट करुन देण्यात येईल, असे श्री.सावंत, प्रोजेक्ट मॅनेजर महाआयटी यांनी सांगितले. त्यानुसार महाआयटी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

२) संचालक, तंत्रशिक्षण, संचालक, उच्च शिक्षण व संचालक, कला शिक्षण यांच्या अंतर्गत येणाऱ्या संस्थातील डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी व त्यानंतरच्या वर्षासाठी महाआयटी यांनी महाडीबीटी पोर्टलमध्ये बदल करुन विद्यार्थ्याच्या प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी (महिन्यामध्ये) नमूद करण्यासाठी संस्थेस पर्याय उपलब्ध करुन दिल्यानंतर, संस्थांनी व विभागीय कार्यालयांनी मंजूर केलेले ऑनलाईन अर्ज संबंधित संस्थांच्या लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी (महिन्यामध्ये) नमूद करण्यासाठी परत पाठविण्यात यावेत.

३) संबंधित संस्थेचे प्राचार्य यांनी सदर अर्जांची फेरतपासणी न करता केवळ संबंधित विद्यार्थ्यांनी जेवढ्या कालावधीसाठी पेईंग गेस्ट/वसतीगृहात राहत असल्याची कागदपत्रे सादर केले असतील, त्यानुसार महिन्यांमध्ये (उदा.१,२,३....९,१०) महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये कालावधी नमूद करुन सदर अर्ज सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या

पाठवावेत व संबंधित विभागीय कार्यालयांनी डीबीटी पोर्टलवर प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीची तपासणी करुन सदर अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विहित कार्यपध्दतीनुसार पुढे पाठवावेत. त्यांनतर महाआयटी यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या तपशिलानुसार वास्तव्याच्या कालावधीनुसार निर्वाह भत्त्याच्या रक्कमेचे ॲलाटमेंट करावे व महाडीबीटी पोर्टलवर प्रत्येक स्तरावरच्या लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांची यादी प्रत्यक्ष कालावधी व अलॉटेड रकमेसह उपलब्ध करुन द्यावी.

४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील याच योजनेंतर्गत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज जे अद्याप संस्थास्तरावर छाननीसाठी प्रलंबित आहेत, त्याबाबत देखिल वरीलप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.

५) सदर योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यांचा वास्तव्याचा कालावधी हा शैक्षणिक वर्ष ज्या महिन्यापासून सुरु झाले आहे, त्या महिन्यापासुन पुढे मोजण्यात यावा, अश्या सूचना संचालक, तंत्रशिक्षण यांच्या स्तरावरुन सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांना त्वरीत देण्यात याव्यात.

६) कला संचालनालयांतर्गत येणाऱ्या संस्थामधील शिष्यवृत्ती व वसतीगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणी (योजनेचे बँक खाते, पीएफएमस योजना मॅपिंग इ.) मुळे लाभाच्या रकमेचे वितरण झालेले नाही. तरी त्यासाठी संचालक, कला संचालनालय व संचालक, माहिती तंत्रज्ञान यांनी प्राथम्याने सदर तांत्रिक अडचणी सोडवुन प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

७) उच्च व तंत्रशिक्षण विभागासह इतर विभागांच्या शिष्यवृत्ती व वसतीगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांची महाडीबीटी पोर्टलव्दारे अंमलबजावणी करतांना येणाऱ्या तांत्रिक व इतर अडचणी सोडविण्यासाठी संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्या स्तरावर संबंधित विभागातील योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे अधिकारी/कर्मचारी यांच्या समवेत किमान महिन्यातून एकदा बैठक आयोजित करुन, तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी सहाय्य करावे.

***********